**ठळक बातम्या**

- राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधीमंडळात सादर होणार

- नागपुरात मिहान इथं अन्न प्रक्रिया प्रकल्पाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन

- मुंबईत पाण्याची टाकी साफ करताना ४ कामगारांचा गुदमरुन मृत्यू

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझिलंडचं भारतापुढं विजयासाठी २५२ धावांचं आव्हान

**<><><><><>**

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार आहे. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार आधी विधानसभेत आणि त्यानंतर विधानपरिषदेत सादर करतील. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवण्यासह काही महत्त्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र उद्यापासून सुरू होत असून ते ४ एप्रिलपर्यंत चालेल. या दुसऱ्या सत्रात २०२५-२६ च्या अनुदान मागण्या आणि विनियोग विधेयकावर चर्चा आणि मतदान होईल.  या काळात

एकंदर २० बैठका होतील. बँकिंग कायदे सुधारणा विधेयक, कोस्टल शिपिंग विधेयक आणि रेल्वे सुधारणा विधेयक यासह अनेक विधेयक या सत्रामध्ये मंजुरीसाठी चर्चेला घेतली जातील.

**<><><><><>**

पतंजलि अन्न प्रकिया प्रकल्पाचा लाभ छोट्या शेतकऱ्यांना होणार असल्याचं  मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. नागपूरच्या मिहान इथं उभारलेल्या पतंजली फूड अँड हर्बल पार्कचं उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि केंद्रीय रस्ते आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं. या प्रकल्पासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून संत्र्यासाठी आवश्यक असणारी दर्जेदार कलमं तयार करण्यासाठी पतंजली आणि राज्यशासन सर्व सुविधांनी युक्त आधुनिक नर्सरी उभारेल, असंही त्यांनी सांगितलं.

या प्रकल्पामुळे दिवसाला जवळपास आठशे टन संत्र्यांची आवश्यकता असून यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळणार असल्याचं केंद्रीय रस्ते आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुख्यमंत्री सहायता कक्षाची व्याप्ती वाढवण्यासाठी टाटा ट्रस्ट वैयक्तिक अनुदान कार्यक्रमाच्या समन्वयातून जास्तीत जास्त गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली. टाटा ट्रस्ट मार्फत सुरू असणारे वैद्यकीय क्षेत्रातील कार्य पाहून मुख्यमंत्री

सहायता निधी कक्ष आणि टाटा ट्रस्ट वैयक्तिक अनुदान कार्यक्रम यांनी संयुक्तरित्या काम करणं अधिक प्रभावी ठरेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. त्यामुळे जास्तीत जास्त प्रकारच्या आजारांवर उपचार करता येतील, तसंच रुग्णालयांची संख्या देखील वाढवता येणार आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या सर्व नागरिकांसाठी आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण संस्थेच्या ४८ व्या वर्धापनदिन सोहळ्याला दूरदृश्यप्रणालीद्वारे ते आज संबोधित करत होते. देशातल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी, संशोधनाला मदत करण्यासाठी आणि त्यांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण संस्था आघाडीवर आहे, असं नड्डा म्हणाले.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. सरकार आरोग्य व्यवस्थेची व्याप्ती वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईची आर्थिक स्थिती भाजपा पद्धतशीरपणे कमकुवत करत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केला आहे. ते आज मुंबईत एका जाहीर कार्यक्रमात बोलत होते. गुजरातमधल्या गिफ्ट सिटीसारख्या सुविधा मुंबईला मिळाव्यात, अशी मागणी त्यांनी केली. मुंबईतला कोस्टल रोड, अटल सेतू आणि इतर

पायाभूत सुविधा प्रकल्पांमधल्या विलंबावर ठाकरे यांनी टीका केली. तसंच, मुंबई शहरातल्या आरोग्य सेवेबाबतही त्यांनी निराशा व्यक्त केली.

**<><><><><>**

मुंबईत नागपाडा मिंट रोड इथं आज निर्माणाधीन इमारतीच्या पाण्याची टाकी साफ करत असताना ४ कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. तर एक जण बचावला आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी जाऊन पाचही कामगारांना बाहेर काढलं आणि जे जे रुग्णालयात दाखल केलं. यातल्या चार कामगारांचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी घोषित केलं. एक जणावर उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात न्यूझिलंडनं भारतापुढं विजयासाठी २५२ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

न्यूझिलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून २५१ धावा केल्या. डॅरिल मिशेलनं सर्वाधिक ६३ धावा केल्या. मायकेल ब्रेसवेलनं नाबाद ५३ धावांच योगदान दिलं. भारतातर्फे वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना, शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ७ षटकांत बीनबाद ४५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं मसूर डाळीवर दहा टक्के आयात शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर पिवळ्या वाटाण्यावर आयात शुल्क न लावण्याच्या निर्णयाला, तीन महिन्यांची म्हणजेच, येत्या ३१ मे पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यासंदर्भातली अधिसूचना आज जारी करण्यात आली. सरकारनं डाळींवर पाच टक्के सीमा शुल्क आणि पाच टक्के कृषी, संशोधन आणि विकास शुल्क असं, एकूण १० टक्के शुल्क लावलं आहे.

**<><><><><>**

माध्यम निरीक्षणविषयी केलेल्या शासन निर्णयाचा उद्देश टीकेला आळा घालणं किंवा माध्यमांवर देखरेख करणं नसून चुकीच्या माहितीचं विश्लेषण करून त्यावर कार्यवाही करणं असल्याचं राज्य सरकारनं स्पष्ट केलं आहे. नागरिकांना अचूक माहिती पुरवणं हे शासनाचं कर्तव्य आहे, चुकीच्या माहितीचं निराकरण करण्यासाठी यंत्रणा उभारण्यात येत असून घटनात्मक मर्यादांचं पालन करणारी कार्यपद्धती विकसित केली जात असल्याचं सरकारने सांगितलं. शासन विविध माध्यम संस्थांशी संवाद साधून या उपक्रमात आवश्यक त्या सुधारणा करत आहे, असंही सरकारने स्पष्ट केलं.

**<><><><><>**

श्रीलंकेत अविस्सवेल्ला इथं आज साईबाबांच्या मंदिराचं उद्घाटन झालं. भारताचे श्रीलंकेतले उच्चायुक्त संतोष झा, ग्लोबल शिर्डी साई फाउंडेशनचे सी. बी. सत्पथी तसंच मोठ्या संख्येनं भाविक यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

परभणीत पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सुर्यवंशीच्या कुटुंबियांची माजी मंत्री छगन भुजबळ यांनी आज भेट घेतली. कायदा सर्वांसाठी सारखा असून दोषींवर कारवाई झाली पाहिजे, असं ते यावेळी म्हणाले…

**होल्ड - बाईट - छगन भुजबळ**

आपण या प्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशीहा याबाबत बोलणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपा देशात फूट पाडण्याचं काम करत असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला आहे. ते आज मुंबई पक्षाच्या निर्धार सभेत बोलत होते. वन नेशन वन इलेक्शन अधिकार शाहीकडे नेणारं असून त्याचा देशाला धोका आहे, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

सतीश भोसले उर्फ खोक्या याला लवकरात लवकर अटक करावी या मागणीसाठी आज बीड जिल्ह्यात शिरूर कासार शहरात बंद पाळण्यात आला. सर्व व्यापाऱ्यांनी बंदला प्रतिसाद दिल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत होणाऱ्या वेव्हज् अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं ॲनिमेशन स्पर्धा आयोजित केली आहे. भारतातल्या

ॲनिमेशन क्षेत्राला चालना देण्यासह मांगा, वेबटून आणि ॲनिमेशन या शैलीमधल्या भारतीय प्रतिभेला जगासमोर आणणं हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान लोहगाव इथं ३९ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस, तर सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं १३ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेल.

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. इतरत्र हवामान कोरडं राहिल.

**//<><><><><>//**